मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर पहिल्या टप्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा आणि दुस-या टप्यात बीड व भंडारा या जिल्ह्यांमध्ये ०२ देशी / संकरीत गाई आणि ०२ म्हशींचा गट वाटप करणे ही योजना सन २०१७-१८ पासून राबविण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र. २३८/पदुम-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ नोव्हेंबर, २०१७.

प्रस्तावना :-

गत ३ ते ४ वर्षापासुन राज्यातील काही विभागात कमी पर्जन्यमानामुळे टंचाईची परिस्थिती उद्भवत असून या अनुषंगाने शासन स्तरावरील विविध विभागांमार्फत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. दुग्धव्यवसाय, शेळी / मेंढ़ीपालन, अंड्यावरील / मांसल कुक्कुट पक्षी पालन हे व्यवसाय शेतीला पुरक व्यवसाय म्हणूण पुढे येत असून, याद्वारे शेतकऱ्यांना हमखास स्वयंरोजगाराचे व अर्थार्जनाचे साधन उपलब्ध होत आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना शेतीसोबतच दूग्धव्यवसाय हा शेतीपुरक व्यवसाय म्हणून ०२ देशी / संकरीत गाई आणि ०२ म्हशींच्या गटाचे वाटप करणे, या योजना राबविण्यास मंत्रिमंडळाने यापूर्वीच मान्यता प्रदान केलेली आहे.

दि.१०.१०.२०१७ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर जालना जिल्ह्याप्रमाणे पहिल्या टप्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा तसेच, दुस-या टप्यात बीड व भंडारा या जिल्ह्यांमध्ये उपरोक्त दोनही योजनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश मंत्रिमंडळाने दिलेले आहेत. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमीत करण्यात येत आहे.

## शासन निर्णय :-

मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर पहिल्या टप्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा तसेच, दुस-या टप्यात बीड व भंडारा या जिल्ह्यांमध्ये ०२ देशी / संकरीत गाई आणि ०२ म्हशींचा गट वाटप करणे, या योजना सन २०१७-१८ पासून राबविण्यास याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

## योजनेचे कार्यक्षेत्र :-

सन २०१७-१८ पासून राज्यातील उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा या चार जिल्ह्यांमध्ये पहिल्या टप्यात व बीड व भंडारा या दोन जिल्ह्यांमध्ये दुस-या टप्यात सर्व प्रवर्गासाठी ५० टक्के अनुदानावर (Back Ended) पात्र लाभार्थ्यांकरीता योजना राबविण्यात यावी.

## योजनेचे स्वरूप :-

सदर योजना सर्व प्रवर्गासाठी असून लाभार्थींना ५० टक्के अनुदान (Back ended) देय असून सदरचे अनुदान गट स्थापनेच्या पहिल्या वर्षी पहिल्या सहा महिन्यात २५ टक्के अनुदान व उर्वरित २५ टक्के अनुदान दुस-या सहा महिन्यात थेट बँक खात्यात जमा करण्यात यावे.

**योजनेअंतर्गत देय अनुदान :-**

प्रत्येक लाभार्थीला २ देशी / संकरीत दुधाळ गाईंचे किंवा ०२ म्हशींचे वाटप करण्यात यावे. सदर योजनेद्वारे सर्व प्रवर्गासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के तथापि, प्रति गट कमाल मर्यादा गाय गटासाठी रू. ५६,०००/- व म्हैस गटासाठी रु. ६६,०००/- या प्रमाणे अनुदान (Back Ended) अदा करण्यात यावे. सदर अनुदान संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचेमार्फत लाभार्थ्याच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात यावे. सदर अनुदान राज्यस्तरीय योजनेतून अदा करण्यात यावे.

**(आकडे रूपयात)**

| अ. क्र. | गटाचे स्वरूप | खरेदी खर्च | पर राज्यातुन वाहतुक खर्च (रू. ५०००/- प्रति गाय/म्हैस) | एकूण | एका गटासाठी ५० टक्के अनुदानासाठी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ देशी / संकरीत गायी (रू. ५१,००० प्रति गाय) | १,०२,०००/- | १०,०००/- | १,१२,०००/- | ५६,०००/- |
| २ | २ म्हशी (रू. ६१,०००/- प्रति म्हैस) | १,२२,०००/- | १०,०००/- | १,३२,०००/- | ६६,०००/- |

**निवडलेल्या लाभार्थ्यांना दुग्धव्यवसायक विषयक प्रशिक्षण :-**

लाभार्थ्यांना संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे मार्फत ३ दिवसांचे दुग्धव्यवसाय विषयक प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. सदर प्रशिक्षणामध्ये देशी / संकरीत दुधाळ जनावरांच्या जाती, म्हशींच्या जाती, त्यांचे संगोपन, निवारा, आहार, जनावरातील माज ओळखणे, कृत्रिम रेतनाचे महत्त्व, कृत्रिम रेतनाची योग्य वेळ, विविध रोग प्रतिबंधक लसीकरण, जंतनाशके पाजणे, गाभण जनावरांची निगा, वासरांचे संगोपन, विविध वैरणीच्या जाती इ. बाबींचा समावेश करण्यात यावा.

**योजनेस प्रसिद्धी:-**

संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे मार्फत या योजनांना स्थानिकरित्या प्रसिध्दी देण्यात यावी.

**दुधाळ जनावरे गटास पशुवैद्यकीय सेवासुविधा :-**

लाभार्थ्यांने नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत गाई/ म्हशींमध्ये कृत्रिम रेतन, विविध रोग प्रतिबंधक लसीकरण, जंत/बाह्य किटक निर्मुलनासाठी उपचार/उपाय योजना इ. करून घ्यावयाच्या आहेत.

**दुधाळ जनावरांचा विमा उतरविणे :-**

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत पशुधन विमा योजनेंतर्गत सदर गाई/ म्हशींच्या गटाचा विमा उतरविण्यात यावा.

**दुधाळ जनावरांचे खाद्य, चारा व व्यवस्थापन :-**

लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या दुधाळ जनावरांना आवश्यक असलेला वाळलेला चारा, हिरवी वैरण, पशु खाद्य, खाद्य पुरके यावरील खर्च लाभार्थ्याने स्वत: करावयाचा आहे.

**लाभार्थी निवडीचे सर्वसाधारण निकष:-**

१. लाभार्थ्यांकडे चारा उत्पादनासाठी स्वत:ची पुरेशी जमीन उपलब्ध असणे आवश्यक आहे.
२. लाभार्थ्यांकडे दुधाळ जनावरांचा गोठा / मुक्त संचार गोठ्यासाठी आवश्यक स्वत:ची जागा असणे आवश्यक आहे.
३. लाभार्थ्याने दुग्ध व्यवसायाचे प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे.
४. शासन स्तरावरून वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार छोटे कुटुंब संकल्पना अवलंबिणारे कुटुंब या योजनेअंतर्गत लाभ घेण्यास पात्र राहतील
५. दुग्ध व्यवसाय करीत असलेल्या व निकषांत बसणाऱ्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे. लाभार्थ्याला दुग्ध व्यवसायाची आवड असणे आवश्यक आहे.
६. सदर योजनेंतर्गत ३ टक्के विकलांग तसेच, ३० टक्के महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावे.
७. मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर राबविण्यात येत असलेल्या २० शेळ्या + २ बोकड गट वाटप या योजनेत लाभ घेतलेला लाभार्थी प्रस्तुत योजनेंतर्गत लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.

**लाभार्थी निवड :-**

या योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड खालीलप्रमाणे गठित समितीद्वारे करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | - अध्यक्ष |
| २. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद | - सदस्य |
| ३. जिल्हा समाज कल्याण अधिकारी | - सदस्य |
| ४. नजीकचे प्रकल्प संचालक आदिवासी विभाग | - सदस्य |
| ५. जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी / त्यांचे प्रतिनिधी | - सदस्य |
| ६. पशुधन विकास अधिकारी, (विस्तार) पंचायत समिती | - सदस्य |
| ७. सहाय्यक आयुक्त पशुसवंर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय | - सदस्य सचिव |

सदर योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी लाभार्थीनी तालुका स्तरावरील पंचायत समिती मधील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेकडे अर्ज सादर करावा. सदर अर्जाची छाननी केल्यानंतर अभिप्रायासह लाभार्थ्यांचे अर्ज पशुधन विकास अधिकारी विस्तार यांचे कडून निवड समितीच्या मंजूरीसाठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत जिल्हा पशुसंर्धन उपआयुक्त यांचेकडे सादर करण्यात यावेत.

एका कुटुंबातील केवळ एका लाभार्थ्यासच या योजनेंतर्गत लाभ घेता येऊ शकेल. तथापि, ५ वर्ष कालावधीनंतर या योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी अर्ज करता येईल. लाभार्थीने हा व्यवसाय किमान ३ वर्षे करणे बंधनकारक राहील. तसेच, या कालावधी दरम्यान पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी गट पडताळणीसाठी आल्यास त्यांना प्रत्यक्ष गट दाखविणे बंधनकारक राहील.

**दुधाळ जनावरे गट खरेदी समिती :-**

प्रस्तुत योजनेअंतर्गत दुधाळ जनावरांची खरेदी खालील समितीमार्फत करण्यात यावी.

१ संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती

२ कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्याचे संस्थाप्रमुख

३ गावातील प्राथमिक सहकारी दूध संस्थेचे (असल्यास) सचिव

४ बँक विमा प्रतिनिधी

५ लाभार्थी.

**या योजनेंतर्गत खरेदी करावयाच्या देशी / संकरीत गायी आणि म्हशींचे गट परराज्यातून खरेदी करण्यात यावेत.**

**योजना अंमलबजावणी अधिकारी :-**

सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी हे संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, हे राहतील. सदर योजनेंतर्गत कोषागारातुन निधी आहरित करून त्याचे संवितरण करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून त्यांना घोषित करण्यात येत आहे.

**बॅक एन्डेड सबसिडी वितरीत करण्यासाठी समिती :-**

या योजनेंतर्गत एकूण ५० टक्के बॅक एन्डेड सबसिडी देय असून, गट स्थापनेच्या पहिल्या वर्षी पहिल्या सहा महिन्यात २५ टक्के व उर्वरित २५ टक्के अनुदान दुस-या सहा महिन्यात थेट लाभार्थीच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे योजनेंतर्गत निवड झालेल्या लाभार्थीस बॅक एन्डेड सबसिडी वितरीत करण्यापूर्वी प्रत्यक्ष गटाची पडताळणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय / संबंधित तालुक्याचे सनियंत्रण करणारे तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाचे सहायक आयुक्त पशुसंवर्धन | - अध्यक्ष |
| २. | पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती | - सदस्य |
| ३. | कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्यावर कार्यरत संस्थाप्रमुख | - सदस्य सचिव |

**योजनेचे संनियंत्रण:-**

१. योजनेचे जिल्हा पातळीवर संनियंत्रण संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडून करण्यात यावे. तसेच, विभागीय पातळीवर प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, आणि राज्य पातळीवर अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, आयुक्त पशुसंवर्धन कार्यालय, पुणे यांच्याकडून करण्यात येऊन तसा अहवाल आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अभिप्रायासह शासनास सादर करण्यात यावा.

२. लाभार्थीस पुरवठा करण्यात आलेल्या २ देशी / संकरीत दुधाळ गाईंची किंवा ०२ म्हशींची विमा पॉलीसी ही लाभार्थी व पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती यांच्या संयुक्त नावे उतरविण्यात यावी.

३. पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती यांनी किमान २५ टक्के दुधाळ जनावरांच्या गटांची पडताळणी करणे आवश्यक आहे. तसेच, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्ह्यातील दौऱ्याच्या वेळी प्रत्येकी किमान ५ टक्के गटांची पडताळणी करणे क्रमप्राप्त राहील.

आयुक्त पशुसंवर्धन यांनी योजनांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हानिहाय लक्षांक, आवश्यक निधी, योजना अंमलबजावणीचा कालबध्द आराखडा इ. माहितीसह या योजनेसाठी नविन लेखाशीर्ष शासनास प्रस्तावित करावे.

सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सुचना आयुक्त पशुसंवर्धन यांनी तात्काळ निर्गमीत कराव्यात.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असुन त्याचा संकेतांक क्र. २०१७१११६१५३५२३३१०१ आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमीत करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,**

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2017.11.16 15:39:10 +05'30'

**(रविंद्र गुरव)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
२. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
३. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
४. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-७.
५. विभागीय आयुक्त, संबंधित.
६. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया, सातारा, बीड व भंडारा
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया, सातारा, बीड व भंडारा
८. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
९. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, पोल्ट्री प्रोजेक्ट कॅम्पस, क्रिशी नगर, जुना आर.टी.ओ.रोड, अकोला.
११. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, (सर्व).
१२. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया, सातारा, बीड व भंडारा
१३. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया, सातारा, बीड व भंडारा
१४. निवड नस्ती (पदुम-४)